# मेट्रोच्या वेगवान कामाची गरज

## आरे ते बीकेसी मार्गिकेच्या रुळांचे निम्मे काम पूर्ण



- एकूण ६६ किलोमीटरचे रूळ उभारले जाणार
- ३३ किलोमीटर रूळ उभारणी पूर्ण
- पहिल्या टप्प्यातील बहुतांश काम पूर्ण
- पहिल्या टप्प्यातील ६० टक्के रूळ उभारणी पूर्ण
- दुसऱ्या टप्प्यातील ५४.४० टक्के काम पूर्ण
- दुसऱ्या टप्प्यातील ४० टक्के रूळ उभारणी पूर्ण

म. टा. खास प्रतिनिधी

**डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्याचे लक्ष्य**

- कुलाबा- सीप्झ मेट्रो-३ डिसेंबरपर्यंत धावण्याची शक्यता
- ५४ टक्के वीज प्रवाह पूर्ण
- मेट्रो ३चा डिसेंबरमध्ये पहिला टप्पा

मुंबई : कुलाबा-सीप्झ या मेट्रो-३ या भूमिगत प्रकल्पातील आरे ते बीकेसी मार्गिकेच्या रुळांचे निम्मे काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पातील पहिला टप्पा डिसेंबर २०२३पर्यंत पूर्ण करायचा असताना रुळांचे निम्मे काम व वीजप्रवाह पुरविण्याचे काही काम बाकी आहे. त्यामुळे पुढील अकरा महिन्यांत हे काम वेगाने पूर्ण करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

मुंबई शहर पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण दिशेला जोडण्यासाठी कुलाबा-सीप्झ मेट्रो-३ ही मार्गिका बांधली जात आहे. या मार्गिकेचा पहिला टप्पा आरे (सारिपूतनगर) ते बीकेसी उत्तर (प्राप्तीकर कार्यालय) असा असेल. ती मार्गिका डिसेंबर २०२३पर्यंत सुरू करण्याचे लक्ष्य हा प्रकल्प उभ्या करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने निश्चित केले आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशननुसार, या मार्गिकेत गाड्यांना वीज पुरविण्यासाठी २५ किलोव्हॅट क्षमतेच्या तारा जोडल्या जात आहेत. पहिल्या टप्प्यातील बहुतांश काम पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या टप्प्यातील हुतात्मा चौक ते कफ परेडदरम्यान वीजप्रवाह पुरविण्यात आला आहे. अशाप्रकारे एकुण ५४.४० टक्के काम पूर्ण झाले आहे.

दुसरीकडे रूळांचा विचार केल्यास, पहिल्या टप्प्यातील ६० टक्के रूळ उभारणी पूर्ण झाले आहेत. तर बीकेसी दक्षिण ते कफ परेड, या दुसऱ्या टप्प्यातील ४० टक्के काम पूर्ण झाले आहे. दुहेरी रुळ उभारणीनुसार, संपूर्ण प्रकल्पात एकूण ६६ किलोमीटरचे रूळ उभारले जाणार आहेत. या ६६ पैकी ३३ किलोमीटर रूळ उभारणी पूर्ण झाली आहे. जवळपास भागातील विद्युतीकरण पूर्ण झाले आहे, त्याच भागातील रूळ उभारणी सद्यस्थितीत पूर्ण झाली आहे.

### पहिला टप्पा आवाक्यात

हा टप्पा डिसेंबरमध्ये सुरू करायचा असताना या तीन विभागांतील कामे निम्म्याहून अधिक बाकी असल्याने ते पूर्ण करण्याचे एक मोठे आव्हान आहे. स्थानकांची उभारणी ९०.४० टक्के व भुयारे १०० टक्के पूर्ण होऊन भुयारीकरणाचे काम ९६.८० टक्के पूर्ण झाले आहे. यानुसार या मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यातील सरासरी ८२ टक्के कामे सध्या पूर्ण झाली आहेत.

### सहार ते सांताक्रूझचे काम बाकी

मार्गिकेच्या पहिल्या टप्प्यात सहार रोड व सांताक्रूझ, या दोन स्थानकांदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (देशांतर्गत टर्मिनल) स्थानकही आहे. रूळ उभारणी व विद्युतीकरण हे दोन्ही याच भागात बाकी आहे. या दोन स्थानकांदरम्यान वायुवीजनासाठी विशेष पंखा बसविला जाणार आहे.

